# काटेवाडीत मेंढ्यांचे गोल रिंगण सोहळा



टाळ मृदंगाचा गजर...माउली-तुकोबा नामाचा जयघोष...अशा वातावरणात संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे मेंढ्यांचे गोल रिंगण काटेवाडी येथे शुक्रवारी उत्साहात पार पडले. या वेळी पारंपरिक पद्धतीने पालखीच्या स्वागतासाठी धोतराच्या पायघड्या घालण्यात आल्या.

# खुनाच्या घटनेनंतर शिक्षण विभागाला पुन्हा आली जाग

## शाळा, शिक्षकांना आचारसंहितेची करून दिली आठवण

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)-** नगर शहरात दोन दिवसांपूर्वी आठवीच्या विद्यार्थ्यांने शाळेत खून केल्याची घटना घडल्यानंतर माध्यमिक शिक्षण विभागाला पुन्हा खडबडून जाग आली आहे. त्यानंतर माध्यमिक शिक्षण विभागाने राज्य सरकारने यापूर्वीच लागू केलेल्या आचारसंहितेची जिल्ह्यातील शाळा, त्यांचे व्यवस्थापन, कार्यरत मुख्याध्यापक आणि शिक्षकांना आठवण करून दिली आहे.

याबाबत माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी, उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, व्यवस्थापन यांना आदेश आदेश काढले आहेत. या आदेशात जिल्ह्यातील शाळेत विद्यार्थ्यांची लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण व्हावे, यासाठी करण्यात आलेल्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अत्याचाराची तक्रार शासनाच्या ई-बॉक्स चिराग या ॲपवर करण्यात यावी, शाळांमध्ये तक्रारपेटीची सोय करावी, विद्यार्थी मानसिक दबावाला पडू नये, यासाठी सर्व शाळा व्यवस्थापनाने स्व खर्चाने समुपदेशनाची व्यवस्था करावी, शाळांमध्ये सखी, सावित्री समितीचे गठन करावे, शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे, शाळांमध्ये नेमणूक करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करून घ्यावी, विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची जबाबदारी शाळांनी घ्यावी, शाळातील स्वच्छतागृहे याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी, शाळांमध्ये येणाऱ्या अभयांगतांसाठी आचारसंहिता लागू करावी आदी सुचना शिक्षण विभागाकडून करण्यात आल्या आहेत.

तसेच शाळांमध्ये काही अनुचित प्रकार अथवा अनिष्ट घटना घडल्यास संबंधित शाळा व्यवस्थापन, संस्था, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी २४ तासाच्या आत संबंधित गटशिक्षणाधिकारी व जिल्हा स्तरावर कळवावी, अन्यथा संबंधित गंभीर शिक्षेस पात्र ठरतील असा इशारा शिक्षणाधिकारी गायकवाड यांनी दिला आहे.

### अंमलबजावणीकडे कोण देणार लक्ष?

▸ राज्य सरकारने यापूर्वीच शाळांमधील विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची जबाबदारी संबंधीती शाळांवर सोपवली आहे. विद्यार्थ्यांच्या वाहतुक करणाऱ्या वाहनावंर जीपीएस प्रणाली कार्यान्वित करावी. प्रत्येक स्कूलबसमध्ये महिला सेवक आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या बसवर असणाऱ्या चालक व महिला सेवक यांची दर आठवड्याला मादक पदार्थ आणि दारू सेवनासंबंधीत चाचणी करण्यात यावी, असे आदेश असतांना जिल्ह्यातील किती शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी होते, याची तपासणी झाली हा संशोधनाचा विषय आहे.

# कापूस, हळद, मका पिकांसाठी हेजिंग डेस्क

## मुख्यमंत्री : शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येणार

**पुणे -** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारमूल्य मिळावे, यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी हेजिंग डेस्क सुरू करण्यात आला आहग. टप्प्याटप्प्याने इतर पिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किमतीतील चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. सेबीचे नियंत्रण असलेल्या एनसीडीईएक्स संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने या प्रकल्पासाठी सहकार्य केलं असून, हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची माहिती देताना सांगितले.

कृषी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्याचा राज्याच्या सकल उत्पन्नात १२ टक्के वाटा आहे. मात्र राज्यातील शेतीमध्ये पिकांचे उत्पादन अजूनही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. शेतीमध्ये पेरणी करूनही निश्चित क्षमतेनुसार उत्पादन आणि उत्पादित मालाला योग्य भाव मिळण्याबाबत शेतकऱ्यांना नेहमीच चिंता असते. शेतकरी पिकांचे उत्पन्न घेतो तरी मालाची किंमत ठरवणारा नसतो ही अनिश्चितता कमी करण्यासाठी शासनाकडूनदेखील विविध शासकीय धोरणे, सुधारित शेती पद्धती, विविध पीक विमा योजनांचे पाठबळ शेतकऱ्यांना दिले जाते. शेतीतून किमान उत्पन्न मिळवण्यासाठी शाश्वत उपायोजना करणे गरजेचे आहे. हेच लक्षात घेऊन वैयक्तिक शेतकरी, मर्यादित संसाधने लक्षात घेऊन शेतकऱ्यांना बाजारपेठेतील ज्ञान मिळावे, यासाठी शासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचललंय. शेतकऱ्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून वाचविण्यासाठी एककेंद्रित समर्पित कृषी हेजिंग डेस्कची स्थापना पुणे येथे करण्यात आली आहे.

### हेजिंग डेस्क म्हणजे काय?

▸ हेज म्हणजे बाहेरून येणाऱ्या संकटांपासून संरक्षण देण्यासाठी, त्यांना अटकाव करण्यासाठी बांधलेले साधन, घराला जसे दार, तसे शेताला कुंपण. किमतीच्या चढ-उतारातून निर्माण होणाऱ्या संकटापासून संरक्षण देणारे जे साधन तेही एक प्रकारचे कुंपणच आहे, ज्याला 'हेजिंग' म्हणतात. भविष्यकाळातील कमी होणाऱ्या किमतींपासून निर्माण होणारी जोखीम कमी करणे हा 'हेजिंग'चा मुख्य उद्देश आहे.

# भोजापूर धरण ८५ टक्के भरले

## ओव्हरफ्लोच्या पाण्यातून तलाव भरावेत- इंजि. चकोर

**लोणी (वार्ताहर)-** नाशिक जिल्ह्यातील सिन्नर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील निमोण-तळेगाव या दुष्काळी भागासाठी काही अंशी संजीवनी असलेल्या भोजापूर धरणामध्ये आजमितीस सुमारे ८५ टक्के (३०७ द.ल.घ.फु.) इतका उपयुक्त पाणी साठा झाला असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे सुरू असलेल्या पाणी आवक या अनुषंगाने हे धरण साधारणतः जुलैच्या पहिल्या आठवड्यातच ओव्हर फ्लो होण्याची दाट शक्यता असल्याचे इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी वर्तविली आहे.

धरण लवकरच ओव्हर फ्लो होणार असल्यामुळे सांडव्यावरून वाहून जाणारे पूर पाणी या धरणाच्या लाभ क्षेत्रातील संगमनेर व सिन्नर तालुक्यातील पाझर तलाव, गाव तळे, साठवण बंधारे व त्यानुसार ल.पा. तलावांमध्ये सोडण्याची मागणी होत असून, त्या दृष्टीने नाशिक पाटबंधारे विभागाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करण्याचे देखील मागणी लाभक्षेत्रातून होत आहे. महत्त्वाचे म्हणजे जलसंधारण विभागामार्फत निमोण-तळेगाव या दुष्काळी विभागातील गावांमध्ये पूर पाणी पोहोचवण्याच्या दृष्टीने पूर्ण करण्यात आलेल्या भोजापूर चारीद्वारे ओव्हर फ्लोचे पाणी पोहोचविण्यात येणार असल्याचे यापूर्वी जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी यापूर्वीच घोषित केलेले आहे. तसेच या कामी संगमनेरचे आमदार अमोल खताळ हे देखील प्रयत्नशील आहेत. त्यानुसार नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक व जलसंधारण विभाग, अहिल्यानगरमार्फत कार्यक्षेत्रावर कार्यवाही देखील सुरू आहे. भोजापूर धरण जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात ओव्हर फ्लो होण्याची शक्यता असल्याने धरणाच्या लाभ क्षेत्रातील व पाण्यापासून वंचित राहिलेल्या लाभक्षेत्रालगतच्या गावातील तलाव भरावेत, अशी मागणी इंजि.चकोर यांनी केली.

# श्रीरामपुरात मटका बुकीच्या पूर्णवादनगरमधील अड्ड्यावर छापा

## ८ लाख ६१ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त; २२ जणांवर गुन्हा दाखल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी) -** शहरातील पूर्णवादनगर परिसरात पोलिसांनी मटका बुकीच्या अड्ड्यावर छापा टाकून ८ लाख ६१ हजार ५६० रुपये इतका मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी सुमारे २२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल रविंद्र मुकिंदा अभंग यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, पोलीस कॉन्स्टेबल अजित पटारे, श्री. काकडे आदींना परिविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांनी पूर्णवादनगर परिसरात (मुळा-प्रवरा, वीज सोसायटी जवळ) काही इसम मटका जुगाराची बुकींग घेत असल्याची माहिती दिली. तात्काळ पोलीस पथकाने सदर ठिकाणी जाऊन खात्री केली असता पूर्णवादनगरकडे जाणाऱ्या रोडवरील मुळा-प्रवरा वीज सोसायटीच्या बाजूला दक्षिणमुखी लोखंडी गेटच्या आतमध्ये प्रवेश केला असता दोन बंद खोल्यांचे दरवाजे उघडून पाहिले असता दोन्ही खोल्यांमध्ये एकूण २२ इसम भिंतींच्या कडेला बसलेले व हातामध्ये मोबाईल तसेच कॅल्क्युलेटरवर मटका बुकींचा हिशोब करताना मिळून आले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी मुनीर इमाम पठाण (मुख्य मटका बुकी, वय-५५, रा. सुभेदारवस्ती), किसन मसु शिंदे (वय-७०, वार्ड न. ०.३, दत्त मंदिराशेजारी), अवधुत मारुती शिंदे (वय-२३, रा. संजयनगर), महेश रामकृष्ण पवार (वय-४५, रा. वार्ड २), विक्रांत रविंद्र लोखंडे (वय-३५, रा. वार्ड नं. ०७ लबडे वस्ती), राहुल कैलास चौधरी (वय-३०, रा. मोरगे वस्ती), ललीत नामदेव तांबे (वय-२९, रा. प्रवरानगर, लोहगाव ता. राहाता), राजु दिनकर पाभारे (वय-५६, रा. सुतगिरणी फाटा), मंजुर सय्यद (वय-३६, रा. काजीबाबा रोड, श्रीरामपूर), ख्वाजाखान सरदारखान पठाण (वय-४८, रा. सुभेदार वस्ती, वार्ड नं. ०२), स्वप्निल नामदेव तांबे (वय-३२, रा. प्रवरानगर), नानासाहेब रंगनाथ तोंडगे (वय-४५, रा. अशोकनगर), नसरुद्दीन शेख (वय-६०, उंदिरगाव, ता. श्रीरामपूर), अल्ताफ अरमान शेख (वय-६२, रा. मिल्लतनगर, श्रीरामपूर), सादिक सहाबुद्दीन शेख (वय-३०, रा. वार्ड नं. १, श्रीरामपूर), आकाश कैलास पोटे (वय-२४, रा. जवाहर कारखाना), लालजीत अर्जुन यादव (वय-३१, रा. वार्ड नं. ०५, श्रीरामपूर), संदीप बाबुराव सूर्यवंशी (रा. भैरवनाथनगर, गोंधवणी), सचिन नंदकुमार गावडे (वय-३७, मोरगे वस्ती), सागर सुरेश भनगे (वय-३०, रा. राजुरी), शाहरुख चॉद खान (वय-२८, रा. कोल्हार, ता. राहाता) असे सांगितले.

सदर इसमाकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही मटका जुगाराची बुकींग घेत आहोत तसेच सदर खोलीत मिळून आलेल्या मोबाईलबाबत हजर इसमांकडे विचारपूस केली असता, हजर इसमांतील मुनीर इमाम पठाण यांनी सांगितले की, सदर मोबाईल हे माझ्या मालकीचे आहे आणि ते मी मटका बुकींगसाठी वापरत असल्याची कबुली दिली.

सदर कारवाई परिविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे आणि त्यांच्या पथकातील पोसई राजेंद्र वाघ, शफी शेख, पोलीस हेडकॉन्स्टेबल शंकर चौधरी, दिगंबर कारखेले, दिनेश मोरे, श्री. भिंगारदिवे, सवश्री पवार, साठे, खेडकर, तांबे, दिपे, ढाकणे, जाधव तसेच श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव, पोलीस कॉन्स्टेबल अजित पटारे, काकडे यांच्यासह पार पडली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शासनाने युरिया खताचा बफर स्टॉक रिलीज करावा: विवेक कोल्हे



**कोपरगाव (प्रतिनिधी)-** पावसाने राज्यात काही प्रमाणात हजेरी लावल्याने अनेक भागात शेतकरी बांधवांनी खरीप पिकांच्या पेरण्या सुरू केल्या आहेत. मात्र, पेरणीच्या निर्णायक टप्प्यावर युरिया खताचा तुटवडा जाणवत असून वेळेवर खत न मिळाल्यास पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे शासनाच्या अखत्यारीतील युरिया बफर स्टॉकपैकी किमान ५० टक्के स्टॉक तत्काळ रिलीज करण्यात यावा, अशी मागणी कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी केली.

खरीप हंगामात युरियाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. सध्या कोपरगाव तालुक्यातील अनेक भागात शेतकरी पेरणीच्या कामात गुंतलेले आहेत आणि खत टंचाईमुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. इतर तालुक्यांप्रमाणे कोपरगाव तालुक्यातही शासनाने एकूण युरिया बफर स्टॉकपैकी ५० टक्के तरी किमान साठा वितरीत करावा, असेही कोल्हे यांनी स्पष्ट केले.

पिकांची योग्य वाढ व उत्पादनासाठी सुरुवातीच्या टप्प्यावर खताचे नियोजन अत्यावश्यक असते. युरिया वेळेवर न मिळाल्यास हजारो हेक्टर क्षेत्रातील पीक संकटात सापडू शकते. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन स्थानिक गोदामातील बफर स्टॉक शेतकऱ्यांच्या गरजेसाठी खुला करावा, जेणेकरून खरीप हंगामात कोणत्याही शेतकऱ्याचे नुकसान होणार नाही.

शेतकऱ्यांची ही गरज वेळेवर पूर्ण झाली पाहिजे, अन्यथा संपूर्ण तालुक्यातील उत्पादन व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो, शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून यासंदर्भात ठोस निर्णय घेण्याची विनंती केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि पेरणीच्या सुरळीत प्रक्रियेसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असेही मत त्यांनी व्यक्त केले.

पान १ वरुन

## कर्जमाफीसाठी उच्चस्तरीय समिती

दालनात बैठका लावल्या आहेत. या बैठकीत ८ ते १० मंत्री सोबत असतील, तेव्हा महत्त्वाच्या निर्णयाचे शासन निर्णय होतील, असेही त्यांनी सांगितले.

## हिंदी सक्तीविरोधात एकच मोर्चा

राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मोर्चा काढणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर लगेच उद्धव ठाकरे यांनी ७ जुलै रोजी आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासूनच सर्व एकत्र का येत नाही? असे प्रश्न विचारले जात होते. यावर आता अखेर तोडगा निघाला असून हिंदीसक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट संजय राऊत यांनी केली आहे. यासोबतच संजय राऊत यांनी राज आणि उद्धव ठाकरे यांचा एकत्रित फोटो देखील पोस्ट केला आहे.

राज्य सरकारच्यावतीने त्रिभाषा सूत्र स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शाळांमध्ये आता पहिलीपासून विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकवली जाणार आहे. राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधामध्ये ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. या आधी राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी तर उद्धव ठाकरे यांनी सात जुलै रोजी मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली होती. दोन्ही ठाकरे बंधू जर मोर्चा काढणार असतील तर एकत्र का नाही? असा प्रश्न त्यामुळे राज्यात विचारला जात होता. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील शाळात हिंदी विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट त्यांनी केली आहे. त्यामुळे हिंदी सक्ती विरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार हे निश्चित झाले आहेत.

### पहिली ते चौथी हिंदी भाषा नको

▸ पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावे. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे. ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही लिहिता वाचता येते फक्त बोलण्यासंदर्भात असेल तर पाचवीपासून हिंदी शिकवली तरी काही हरकत नाही. पाचवीपासून हिंदी सक्ती करावी अशी भूमिका अजित पवारांनी मांडली आहे.

### मोर्चात काँग्रेसचा सहभाग

▸ प्रमुख राज ठाकरे यांच्यावतीने बाळा नांदगावकर यांनी काँग्रेसचे नेते विजय वड्डेटीवार यांना संपर्क केला होता. मराठीसाठी एकत्र येण्याची ही वेळ आहे. ही हाक पक्षाने नाही तर भाषेने दिली आहे, असे याबाबत माहिती देताना वड्डेटीवार यांनी म्हटले आहे.

## २०२६ मध्ये साखर उत्पादनात १५ टक्के वाढ

काहीसा स्थिर होईल. तसेच इथेनॉलसाठी साखर वळवणं व साखरेची निर्यात वाढवणं शक्य होईल, असंही क्रिसिलने म्हटलं आहे. त्यामुळे साखर उद्योगाला ऊसाच्या वाढत्या दराचा, इथेनॉलच्या स्थिर किंमतींचा आणि मर्यादित निर्यातीचा जाच काही प्रमाणात कमी होईल, असा क्रिसिलचा अंदाज आहे. २०२५ मध्ये उत्पादन खर्च वाढल्यामुळे साखर कारखान्यांचं ऑपरेटिंग मार्जिन म्हणजेच नफा ८.७ ते ९ टक्क्यांपर्यंत घसरला होता. मात्र २०२६ मध्ये साखर उत्पादन वाढल्यामुळे हे मार्जिन ९ ते ९.५ टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे, असंही क्रिसिलने सांगितलं आहे. यासाठी क्रिसिलने ५४ साखर कारखान्यांच्या ७० हजार कोटी रुपयांच्या आर्थिक उलाढालीचा अभ्यास केल्याचा दावा केला आहे.

गेल्या दोन हंगामांमध्ये उसाच्या एफआरपीमध्ये म्हणजेच रास्त आणि किफायतशीर दरात ११ टक्के वाढ झाली. परंतु इथेनॉलच्या विक्री दरात फारशी वाढ झालेली नाही. त्यामुळे साखर कारखान्यांच्या नफ्यावर मर्यादा येत आहेत. २०२५ मध्ये अंदाजे ३५ लाख टन साखर इथेनॉलसाठी वळवण्यात आली होती. परंतु २०२६ मध्ये हे प्रमाण ४० लाख टनांवर जाईल, असं क्रिसिलचं म्हणणं आहे. तसेच सरकारच्या २० टक्के इथेनॉल मिश्रणाच्या उद्दिष्टाचा आधार मिळेल, असंही क्रिसिलचा अंदाज आहे. २०२६ शेवटी साखरेचा साठा मागील वर्षाइतकाच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे साखर कारखान्यांच्या खेळत्या भांडवली कर्जात मोठी वाढ होणार नाही. सध्या केवळ नियत काळजी व आधुनिकीकरणासाठी मर्यादित गुंतवणूक होत असल्यामुळे, एकात्मिक कारखान्यांचं एकूण कर्ज नियंत्रणात राहील, असं क्रिसिल रेटिंग्सच्या संचालिका पूनम उपाध्याय यांनी सांगितलं.

सध्या देशांतर्गत साखरेचे दर ३५ ते ३८ रुपये प्रति किलो आहेत आणि उत्पादन वाढूनही हे दर स्थिर राहतील, असा अंदाज आहे. २०२५ मध्ये साखरेची निर्यात फक्त १० लाख टनांवर मर्यादित होती. पण २०२६ मध्ये साखरेचा साठा आणि उत्पादन वाढल्यामुळे ही निर्यात पातळी कायम राखता येईल. मात्र, इथेनॉलसाठी किती साखर वळवली जाते, देशांतर्गत साखरेचा पुरवठा, महागाईची स्थिती काय राहील आणि आंतरराष्ट्रीय साखर दर कसे राहतील, यावर साखर निर्यातीवरील निर्बंधाबद्दलचा निर्णय अवलंबून राहील, असंही क्रिसिलने सांगितलं आहे.

## खैरेंची नाशिकला बदली, कलुबर्मे नगरचे अपर अधीक्षक

पोलीस प्रशिक्षण अकादमीत नवीन जबाबदारी सांभाळणार आहेत. त्यांच्या जागी श्रीरामपूर येथील अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे हे अहिल्यानगर येथे रूजू होणार आहेत. मात्र, कलुबर्मे यांची बदली झाल्यामुळे श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षकपद सध्या रिक्त झाले आहे. लवकरच या पदासाठीही नवीन नियुक्ती अपेक्षित आहे.

दरम्यान, ठाणे ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक भारत तांगडे यांची बदली नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक म्हणून करण्यात आली आहे. तर नाशिक लाचलुचपत विभागाच्या पोलीस अधीक्षकपदी कार्यरत असलेल्या शर्मिला घार्गे यांची बदली छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उपआयुक्तपदी करण्यात आली आहे. राज्य सरकारने शुक्रवारी केलेल्या बदल्या या ८३ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या असून, गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या बदल्यांवर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे.

## विम्यासाठी आता ॲग्रीस्टॅक, ई-पीक पाहणी सक्तीची

विमा भरण्यासाठी शासनाने सुधारित आदेश जारी केला आहे. यात नुकसान भरपाईच्या नियमांत देखील बदल केल्याचे दिसून येते. यावर्षीपासून खरीप हंगामातील पिकांचा विमा भरताना शेतकर्यांना हिश्श्याची रक्कम भरावी लागणार आहे. खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के तसेच रब्बी व खरीप हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के विमा रक्कम शेतकर्यांना भरावी लागणार आहे.

यंदापासून लागू केलेला पीक विमा हा उत्पन्न आधारीत राहणार असून यासाठी कृषी विभागाच्यावतीने राबवणारी पीक कापणी प्रयोग विचारात घेऊन विमा भरपाई देण्यात येणार आहे. यंदा पासून काढण्यात येणाऱ्या पीक विमा योजनेत संबंधित शेतकर्यांना सहभागी होण्यासाठी केंद्र शासनाने विकसित केलेले मोबाईल ॲप (सीसीई ॲप) वापरणे बंधनकारक असून भाडेपट्टीने शेतीकरणारांने नोंदणीकृत भाडेकरार अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच मागील ७ वर्षांपैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षांचे सरासरी उत्पादन गुणिले पिकाचा जोखिमस्तर विचारात घेण्यात येणार आहे. तसेच विम्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक (ॲग्रीस्टॅक) असणे अनिवार्य असून नुकसान भरपाईसाठी ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालवधीत नैसर्गिक आपत्तीमुळे हंगामातील शेवटची घट गृहीत धरण्यात येणार असल्याचे पिक विम्याच्या सुधारित शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता

▸ भात १५२.५० रुपये, बाजरी ६४० रुपये, भुईमूग ११२.५० रुपये, सोयाबीन १,१६० रुपये, मूग ५१५ रुपये, उडीद ५०० रुपये, तूर ९४० रुपये, मका ३६० रुपये, कांदा ५१० रुपये, कापूस १,८०० रुपये असा राहणार आहे.